# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२५/०९/२०१६

**१) घरासमोरील होंडा शाईन रात्रीला चोरी. :—**

दिनांक २३/०९/२०१६ ते २४/०९/२०१६ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी घरासमोरील पळवीत फिर्यादीने आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ०१५९ काळया रंगाची होंडा शाईन कि. ४०,०००/—रू. ची ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादी अनिल चरनदास सुखदेवे वय ५० वर्ष रा. कोथुर्णा हल्ली मु. गणेशपुर भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) दुकानासमोर उभ्या ट्रकची चोरी . :—**

दिनांक २४/०९/२०१६ रोजी ००.३० वा. ते ०२.३० वा. दर. यातील फिर्यादी आपला ट्रक क्र. एमएच ४० / ५८६१ कि. ३,००,०००/—रू. चा पुजा बॅग दुकानासमोर उभा करून ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन ट्रक चोरून नेल्याने फिर्यादी अब्दुल बसीत अब्दुल बारी शेख वय ५५ वर्ष रा. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) रूम खाली उभी ठेवली मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक २३/०९/२०१६ रोजी २३.०० ते २४/०९/२०१६ चे ०७.३० वा. दर. यातील फिर्यादी आपली काळया रंगाची हिरो होंडा पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३५ एम ८०३२ कि. २५,०००/—रू. ची रूमचे खाली उभे करून ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादी प्रभातकुमार देविदास गुहेरा वय ५२ वर्ष रा. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) कुत्र्याला मारल्याचे तक्रारी वरून अश्लिल शब्दात शिविगाळ व विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १७/०९/२०१६ रोजी १२.०० ते १३.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले मोटार सायकल ने घरी परत जात असता यातील आरोपीने तिचे समोर मोटार सायकल ने येवुन फिर्यादीस थांबुन अश्लिल शब्दात शिविगाळ करून तु माझे विरूध्द पो.स्टे. भंडारा येथे कुत्र्याला मारले म्हणुन तक्रार दिली. तुला भंडारा येथे राहु देणार नाही, अशी धमकी देवुन फिर्यादीचा हात पकडुन तु माझे सोबत चाल तुझा तोंड काळा करतो असे म्हटले वरून फिर्यादी ही घाबरून आपले घरी गेली असता आरोपी हा पाठीमागे येवुन अश्लिल गाणे म्हणुन फिर्यादीचे मनात लज्जा निर्माण होईल असे ईशारे टोमणे मारून विनयभंग केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व बयान वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(२),२९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) घराचे बांधकाम वरून डोक्यावर व हाताचे मनगटावर काठीने मारून जखमी केले. :—

दिनांक २४/०९/२०१६ रोजी ०६.३० वा. दर. यातील फिर्यादी चे घराचे बांधकाम सुरू असुन आरोपीचे घराचे बाजुने खिडकीचा सज्जा तयार केला असुन यातील आरोपीतांनी संगनमत करून आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे खिडकीचा सज्जा सब्बलीने खचवीत असता फिर्यादीने त्यास सज्जा कशाला खसवीते असे हटकले असता त्याचे सोबत तोंडा—तोंडी भांडण करून आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे डोक्यावर, डावे हाताचे मनगटावर लाकडी काठीने मारून जखमी केले व आरोपी क्र.२ ते ४ यांनी भांडण करून आरोपी क्र. १ ला फिर्यादीस मारण्यास प्रोत्साहीत केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक २४/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, पवनी व अडयाळ येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हात भट्टी दारू कि. २,०००/—रू. तसेच ९०० मिली लिटर देशी दारू कि. २५०/—रू. तसेच जुगारातुन कि. ६५६/—रु. असा एकुण २,९०६/—रू. चा माल जप्त करण्यात आला

प्रभारी पोलीस अधीकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.